# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २४/०९/२०२२ (शनिवार)**

**(सायंकाळ)**

---

### सर्पदंशामुळे मृत्यु

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील येथे मौजा रिगणाबोडी दि. २३/०९/२२ चे ०६.४५ वा. चे सुमारास **मंजूळा भागवत ठाकरे (मृतक), वय ६० वर्ष रा. रिगणाबोडी ता काटोल जि नागपूर** ही तीचे मुलीसह शेतामध्ये काम करीत असतांना अचानक तिच्या उजव्या हाताच्या बोटाला सापाने चावा घेतला. तिची प्रकृती खराब झाल्याने तिला उपचाराकामी प्रथम पिएचसी कोंढाळी व नंतर मेडीकल कॉलेज नागपूर येथे भरती केले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. सदर मर्गचे कागदपत्र पो.स्टे. कोंढाळी ला प्राप्त झाल्याने सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा विकास बेलसरे मेडीकल बुथ, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार हरीश सरोदे मो.क्र. ९८६०४२७९०२ हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. बेला :– अंतर्गत कस्तुरबा रूग्नालय सेवाग्राम जि. वर्धा येथे दिनांक २१/०९/२०२२ चे ०६.०० वा. दरम्यान **लक्ष्मण पांढुरंग पिंपळेकर (मृतक), वय ६५ वर्ष, रा. बेला** हा हनुमान मंदिरातुन दर्शन करून घराकडे पैदल जात असतांना पाउस आल्याने त्याचा पाय घसरून तो खाली पडला. त्याला मार लागल्याने त्यास उपचाराकामी सेवाग्राम येथे भरती केले असता दि. १६/०९/२२ चे १६.०० वा. तो मरण पावला. सदर मर्गची पोस्ट सेवाग्राम येथुन कागदपत्रे प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोना निलेश पिंपडे पो.स्टे. बेला यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बेला येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार अजय चौधरी मो.नं. ९८२३१८६६८६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर